# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 08 December 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – ०८ डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०

****

- विधानसभा अध्यक्षपदासाठी भाजपचे राहुल नार्वेकर यांचा एकमेव अर्ज दाखल
- राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात आज १०५ नवनिर्वाचित आमदारांना सदस्यत्वाची शपथ
- नांदेड जिल्ह्यात ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटच्या पडताळणीत एकाही मताचा फरक नसल्याचं स्पष्ट
- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या ४२ व्या वर्धापन दिन कार्यक्रमांची सुरुवात

आणि

- बॉर्डर - गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला दुसरा सामना, तसंच महिला क्रिकेटमध्ये दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारत ऑस्ट्रेलियाकडून पराभूत

****

राज्य विधानसभेच्या अध्यक्ष पदासाठी भारतीय जनता पक्षाचे आमदार राहुल नार्वेकर यांचा एकमेव अर्ज दाखल झाला आहे. त्यामुळे या पदावर नार्वेकर यांची बिनविरोध निवड होत आहे. सभागृहात त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. आज दुपारी नार्वेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत अध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल केला होता. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. विधानसभा अध्यक्षपदासाठी आज दुपारी बारा वाजेपर्यंत अर्ज दाखल

करण्याची मुदत होती. मात्र, अन्य कोणाचाही अर्ज दाखल न झाल्यानं नार्वेकर यांची निवड बिनविरोध होत आहे.

****

दरम्यान, राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी तात्पुरते अध्यक्ष कालीदास कोळंबकर यांनी १०५ नवनिर्वाचित आमदारांना विधानसभा सदस्यत्वाची शपथ दिली. काल पहिल्या दिवशी ईव्हीएम मशीनवर संशय व्यक्त करत शपथग्रहण समारंभावर बहिष्कार टाकलेल्या महाविकास आघाडीच्या सदस्यांनी आज सदस्यत्वाची शपथ घेतली. अधिवेशनाचं कामकाज सुरु होण्याआधी महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक झाली, त्यात बहिष्कार मागे घेऊन सदस्यत्वाची शपथ घेण्याचा निर्णय झाला. शपथविधीनंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. आज शपथ घेतलेल्यांमध्ये नाना पटोले, राधाकृष्ण विखे पाटील, दिलीप सोपल, मंगलप्रभात लोढा, नितीन राऊत, विजय वडेट्टीवार, चंद्रशेखर बावनकुळे, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, अब्दुल सत्तार, अमित देशमुख, अस्लम शेख, तानाजी सावंत, आदित्य ठाकरे यांचाही सहभाग होता. अजुनही विनय कोरे, जयंत पाटील, उत्तम जानकर, शेखर निकम, विलास भुमरे, वरुण सरदेसाई, मनोज जामसुतकर आणि सुनील शेळके या आठ सदस्यांचा शपथविधी शिल्लक आहे.

****

दरम्यान, सत्ताधारी महायुतीच्या सदस्यांनी आज विधानभवनाच्या पायऱ्यांवर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा विरोध करणाऱ्या महाविकास आघाडीचा निषेध केला. सदाभाऊ खोत, गोपीचंद पडळकर, विजय देशमुख, बालाजी किणीकर हे सदस्य या घोषणाबाजीत सहभागी झाले होते. तत्पूर्वी ईव्हीएमवर शंका घेणं हा संविधानाचा अपमान असल्याची टीका भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

****

मतपत्रिकेवर मतदान घेण्यावरून चर्चेत आलेल्या सोलापूर जिल्ह्यातल्या मारकडवाडी गावाला ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. मारकडवाडी ग्रामस्थांनी स्वतःच्या मतांची पडताळणी करण्यासाठी मतपत्रिकेवर मतदान घेण्याचा निर्णय घेतल्यास त्यावर प्रशासनानं आक्षेप घेण्याचं काहीही कारण नाही, असंही ते म्हणाले. मतपत्रिकेवर मतदान घेण्यासाठी गावोगावी ठराव घेण्याची

सूचना त्यांनी दिली. लोकशाही टिकवण्यासाठी ईव्हीएम मशीन नको ही चळवळ अधिक तीव्र करण्याची गरज असल्याचं पवार म्हणाले.

****

मारकडवाडी इथं ईव्हीएम मशीन मध्ये बिघाड झाला असण्याची शक्यता असू शकेल, मात्र, एखादं मशीन बिघडलं म्हणजे सर्वच ईव्हीएम खराब आहेत असा त्याचा अर्थ होत नाही, असं मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केलं आहे. ते आज नाशिक इथं वार्ताहरांशी बोलत होते. ग्रामस्थांना काही शंका असतील तर निवडणूक आयोगाने त्याचा तपास करून शंका निरसन केलं पाहिजे, असं आठवले म्हणाले.

****

नांदेड जिल्ह्यात लोकसभा पोटनिवडणूक आणि विधानसभेच्या निवडणुकीत इव्हीएम आणि व्हीव्हीपॅटच्या मतांची पडताळणी निवडणूक आयोगाच्या सूचनाप्रमाणे करण्यात आली. यासंदर्भात अधिक माहिती देत आहेत आमचे वार्ताहर –

***लोकसभेच्या तीस आणि विधानसभेच्या पंचेचाळीस अशा एकूण पंच्याहत्तर मतदान केंद्रावरील मतमोजणी बिनचूक असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिली. लॉटरी पद्धतीनुसार या निवडक केंद्रांची सर्व उमेदवारांच्या प्रतिनिधींच्या समक्ष चिठ्ठी काढून निवड करण्यात आली होती. तर मतमोजणीची ही पडताळणी प्रक्रिया निवडणूक निरीक्षकांच्या पुढे केली गेली.***

***आकाशवाणी बातम्यांसाठी नांदेडहून अनुराग पोवळे***

****

सीमा सुरक्षादल गेली सहा दशकं देशाच्या सीमा सुरक्षेला मजबुती देण्याचं महत्त्वपूर्ण काम करत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी केलं. ते आज जोधपूरमध्ये सीमा सुरक्षा दलाच्या ६०व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. सीमा सुरक्षा दलाच्या योगदानाशिवाय देशासमोरच्या सुरक्षा आव्हानांना सामोरं जाणं अशक्य असल्याचंही ते म्हणाले. जोधपूरमधल्या सीमा सुरक्षा दलाच्या राजस्थान फ्रंटियर हेडक्वार्टरमध्ये पहिल्यांदाच संचलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. संचलनात स्वदेशी हेलिकॉप्टर ध्रुव आणि एमआय १७

देखील सहभागी झाली आहेत. यासोबतच श्वानपथकही या कार्यक्रमात सहभागी झालं असून, या कार्यक्रमात सात सैनिकांना शौर्य पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करून वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांची सुरुवात आज करण्यात आली. महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. वर्धापन दिनानिमित्त उद्यापासून तीन दिवस विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. यामध्ये रक्तदान शिबिर, क्रिडा स्पर्धा, व्याख्यान आदी कार्यक्रमांचा समावेश आहे.

****

बॉर्डर – गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या अॅडलेड इथं झालेल्या दुसऱ्या सामन्यात भारताला पराभव पत्करावा लागला. ऑस्ट्रेलियानं हा सामना दहा गडी राखून जिंकला असून, पाच सामन्यांच्या मालिकेत १ – १ अशी बरोबरी साधली आहे.

आज सामन्याच्या तिसऱ्या दिवशी भारताचा दुसरा डाव केवळ १७५ धावांतच आटोपला. नितीश रेड्डी यानं सर्वाधिक ४२ धावा केल्या. ऑस्ट्रेलियानं पहिल्या डावात भारतावर १५७ धावांची आघाडी घेतली होती. त्यामुळे दुसऱ्या डावात त्यांच्यासमोर विजयासाठी केवळ १९ धावांचं आव्हान उरलं. ते ऑस्ट्रेलियानं एकही गडी न गमावता पूर्ण केलं. मालिकेतला तिसरा सामना येत्या १४ डिसेंबरपासून ब्रिस्बेन इथं खेळला जाणार आहे.

****

महिला क्रिकेटमध्ये देखील ब्रिस्बेन इथं झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतावर १२२ धावांनी विजय मिळवला. या विजयासोबत ऑस्ट्रेलियानं तीन सामन्यांच्या मालिकेत दोन – शून्य अशी आघाडी घेतली आहे.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करत ऑस्ट्रेलियाच्या संघानं ५० षटकात आठ बाद ३७१ धावा केल्या. या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा संपूर्ण संघ ४४ षटकं आणि पाच चेंडूंमध्ये २४९ धावा करून माघारी परतला. मालिकेतला तिसरा आणि अखेरचा सामना येत्या ११ डिसेंबरला पर्थ इथं होणार आहे.

****

अहिल्यानगर जिल्ह्यात तरवडी इथल्या सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समितीच्या वतीने देण्यात येणारे यंदाचे दीनमित्रकार मुकुंदराव पाटील राज्यस्तरीय पत्रकारिता आणि साहित्य पुरस्कार जाहीर झाले आहेत. राधेशाम जाधव यांना पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला असल्याची माहिती, स्मारक समितीचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी दिली. यासह इतर साहित्य पुरस्कारांचं वितरण येत्या २२ तारखेला तरवडी इथं होणार आहे.

****

सातारा जिल्ह्यातल्या किल्ले प्रतापगडावर आज शिवप्रताप दिन साजरा करण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, यांच्या हस्ते भवानी मातेची महापूजा करण्यात आली. ध्वजस्तंभाचं पूजन करुन शिवशाहीचे प्रतीक असणाऱ्या भगव्या ध्वजाचं रोहण करण्यात आलं. आरतीनंतर मानाच्या पालखीची मान्यवरांच्या हस्ते पूजा करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची पालखीतून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.

****

कोणत्याही राज्याचं राज्यपालपद मिळवून देण्याचं आमिष दाखवून तामिळनाडू इथल्या एका इसमाला पाच कोटी रुपयांचा गंडा घालणाऱ्या नाशिकच्या एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. निरंजन कुलकर्णी असं या आरोपीचं नाव असून, त्याने तामिळनाडू इथल्या नरसिम्हा रेड्डी या व्यक्तीला आपल्या राजकीय ओळखी सांगून, कोणत्याही राज्याचं राज्यपालपद मिळवून देण्याचं आमिष दाखवून त्यासाठी १५ कोटी रुपयांची मागणी केली आणि त्यातले पाच कोटी आठ लाख रुपये देखील घेतले होते. न्यायालयाने या आरोपीला दहा दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

****